# संवादिनी

जाणीव व वंचित विकासचे मासिक संवादपत्र

* वर्ष १३ वे * * एप्रिल - मे २०२२ * * प्रसिद्धी- जून २०२२

अंक : दुसरा

नमस्कार,

ती..

काय मागते ... ???

ताजे, पौष्टिक अन्न

मनासारखे कपडे व दागिने घालण्याचा हक्क

उच्च शिक्षण घेण्याचा हक्क

स्वतंत्र व्यवसाय व नोकरी करण्याचा हक्क

मनासारखा जोडीदार शोधण्याचा हक्क

सांपत्तिक अधिकार

स्वतंत्र विचार करण्याचा हक्क

माणूस म्हणून जगण्याचा हक्क

कोणतेही भेद न करता सामावून घेईल असा समाज

मानसन्मान ...

तिच्यातील स्त्रीत्त्वाचा सन्मान

परमेश्वराने सर्वच स्त्रिया कोणताही भेदभाव न करता एक सारख्या घडविल्या आहेत. पण समाजाने मात्र अविवाहित, विधवा, सधवा, परित्यक्ता, घटस्फोटित इत्यादी लेबल लावून त्यांच्यात फूट पाडली. सधवा व इतर बायका यांच्यात एक प्रकारची भिंतच तयार केली आहे. या भिंती पाडल्या पाहिजेत. प्रौढ कुमारिका, विधवा, परित्यक्ता यांना सगळ्या धार्मिक गोष्टींपासून दूर ठेवले जाते. त्यांच्या मनाला होणाऱ्या यातनांचा विचार समाज कधी करणार का नाही ? कोणत्याही कारणास्तव अशी स्त्री एकटी राहत असेल तर ती 'एकल महिला' असेल, कोणत्याही प्रकारचे लेबल लावून तिच्या स्त्रीत्त्वाचा अपमान करुन तिला वाळीत टाकू नका.

याशिवाय मूल असणारी, मूल नसणारी, फक्त मुलीच असणारी, मुलगा असणारी अशी ही उतरंड समाजाने तयार केली आहे. ही उतरंड मोडून काढली पाहिजे.

वंचित विकास संस्था या भेदाच्या भिंती व ही उतरंड मोडून काढण्याचे काम १९८५पासून सातत्याने करते. संस्थेने प्रबोधनामध्ये मांडलेले स्त्री प्रश्नावरील विचार प्रत्यक्षात कसे आणायचे हे पण प्रयोगाने दाखवले आहे.

लातूर येथील सबला महिला केंद्रात गावातील सर्व महिलांनी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम एकत्रितपणे साजरा केला. हा कार्यक्रम कोणताही भेदभाव न करता साजरा झाला. हे जर छोट्या गावात घडू शकतं तर ते इतर कुठेही घडू शकेल, नाही का ?

वंचित विकास संस्थेचा अभया हा मैत्री गट आहे. या गटामध्ये तिची (स्त्रीची) ओळख फक्त तिचे नाव असते. एवढी ओळख पुरेशी आहे नाही का ?

हा विचार देशभर पोहोचवण्यासाठी आम्ही सातत्याने काम करीत आहोत. एका पिढीत होणारे हे काम नाही, हा विचार पुरुषांइतकाच स्त्रियांनाही पटवणे अवघड आहे. कारण वर्षानुवर्षाचे स्त्रिचे स्वतःचे दुय्यम स्थान मान्य करण्याचे संस्कार बदलायला तिलाही वेळ लागेल.

या प्रबोधनाच्या कामासाठी आपण सर्वांनी आम्हाला सर्व प्रकारचे बळ द्यावे ही विनंती.

आपले,

मीना कुर्लेकर

सुनीता जोगळेकर

संचालक मंडळ-वंचित विकास

**अभया सन्मान दि.१६ मे २०२२**

**प्रत्येक स्त्रीमध्ये दडलेली असते रणरागिणी – श्री दिलीप देशमुख यांचे मत**

* ''अहिल्याबाई होळकरांनी राज्य राखले, राणी लक्ष्मीबाई स्वबळावर लढल्या. स्त्रिया आपल्या आयुष्यात अहिल्याबाई, राणी लक्ष्मीबाईंचे रुप

आहेत. प्रत्येक स्त्रीमध्ये एक रणरागिणी दडलेली असतेच.'' असे मत माजी सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री दिलीप देशमुख यांनी व्यक्त केले.

परिस्थितीशी दोन हात करणाऱ्या तेजस्विनींना वंचित विकास संचालित अभया मैत्रीगटाच्या वतीने अभया सन्मानाने गौरविण्यात आले. कार्यक्रमाला ज्येष्ठ अभिनेत्री लीला गांधी, जयमाला इनामदार, लर्निंग लिंक्स फाऊंडेशनच्या स्वाती दुधाले, वंचित विकास संस्थेचे अध्यक्ष श्री विजयकुमार मर्लेचा, उपाध्यक्ष ॲड.तानाजी गायकवाड इ. उपस्थित होते.

श्रीमती अर्चना धडे, श्रीमती दीपा पांडे, श्रीमती मनीषा पांढरे, श्रीमती सुनीता शहा, श्रीमती शोभा चितळे, श्रीमती वनमाला भिसे, श्रीमती प्रभा शिवणेकर यांचा सन्मान करण्यात आला. तसेच कोरोना काळात लढवय्या वृत्तीने परिस्थितीशी सामना करत उद्योजकता प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

## महिला मेळावा

* सोमवार दि.११एप्रिल २०२२ रोजी वाशी, जि. उस्मानाबाद येथे महात्मा फुले जयंती व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त एकल महिला मेळावा मन्मत स्वामी मठ,वाणी गल्ली, वाशी येथे घेण्यात आला. दुपारी १२ ते ३ वाजण्याच्या दरम्यान महिला मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमाला मुख्यत्वे विधवा, परित्यक्ता, आर्थिकदृष्ट्या कमी उत्पन्न गटातील महिला, एकल महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमात संस्थेच्यावतीने श्रीमती मिनाक्षी नवले, श्रीमती माया भांगे, श्री अजयकुमार निकुंभ, श्री शमशुद्दिन शेख, श्रीमती रंजना चव्हाण, तसेच डॉ. नीलम ताटके उपस्थित होत्या.

एकल महिलांनी दुसऱ्यांवर अवलंबून न राहता कणखरपणे माणूस म्हणून जगण्यासाठी आपली सामाजिक व आर्थिक बाजू भक्कम करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे मत संस्थेच्या वतीने श्रीमती मिनाक्षी नवले यांनी व्यक्त केले. या मेळाव्यात ई-श्रम कार्डाचे महत्व व ई-श्रम कार्ड काढून देणे, एकल महिलांना न्याय मिळवून देणे, त्यांना संघटीत करुन न्याय मिळवून देणे याबाबत श्री रामभाऊ लगाडे, श्रीमती माया भांगे, श्रीमती रंजना चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

* गुरुवार दि.१४एप्रिल २०२२ रोजी वाशी, जि. उस्मानाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शाळा, महाविद्यालय, नगर पंचायत, विविध शासकीय कार्यालयात प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.

## धरणे आंदोलन

* दि. २८मे २२ रोजी वाशी जि. उस्मानाबाद तालुक्यात जाणीव संघटनेच्या वतीने गायरानधारक शेतकऱ्यांचे नावे गायरान पट्टे व जमिनीचे पंचनामे करा या मागणीसाठी धरणे आंदोलन रामभाऊ लगाडे यांच्या नेतृत्त्वाखाली करण्यात आले. यावेळी अव्वल कारकून श्री पाटील एस एस यांनी निवदेन स्वीकारले. यावेळी अनेक गायरानधारक उपस्थित होते.

## रानवारा आता दृक-श्राव्य स्वरुपातही... करा चॅनेल सबस्क्राईब

शिक्षकांनी वर्गात प्रश्न विचारला,'उष्णतेमुळे पदार्थ प्रसरण पावतो म्हणजे मोठा होतो आणि थंडीमुळे आकुंचन पावतो म्हणजे लहान होतो. याचं एखादं उदाहरण सांगा बघू.'

हुश्शार बंड्या पटकन उत्तरला,'सर,उन्हाळ्याची सुट्टी आणि डिसेंबरची हिवाळी सुट्टी. उन्हाळ्यात उष्णता जास्त म्हणून सुट्टी मोठी आणि हिवाळ्यात थंडी जास्त म्हणून सुट्टी छोटी.' सरांसकट सगळा वर्ग हसण्यात बुडाला.

तर मित्र-मैत्रिणींनो, तुमची प्रसरण पावलेली उन्हाळी सुट्टी सुरु झालीय. हो ना?
काय काय करायचं ठरवलं आहे सुट्टीत? मज्जा तर तुम्ही करणारच आहात. तुमच्या सुट्टीच्या आनंदात भर घालण्याकरता तुमचा लाडका 'रानवारा' दृक-श्राव्य स्वरुपात येतो आहे.

सुट्टी म्हणजे धमाल, दंगा मस्ती, मग ती कोणतीही सुट्टी असली तरी त्यानिमित्ताने थोडे जास्त खेळायला मिळते, फिरायला मिळते, सुट्टीच्या दिवशी अभ्यास थोडासाच केली तरी चालतो, हो ना !

तुमच्या सुट्टीचा आनंद व्दिगुणित व्हावा म्हणून तुमचे लाडके 'निर्मळ रानवारा' आता तुम्हाला दर महिन्याला दृक-श्राव्य स्वरूपात भेटणार आहे. आहे ना मजा ?

'वंचित विकास' या सामाजिक संस्थेमार्फत ३५ वर्ष प्रकाशित होणारा दर महिन्याचा रानवाराचा अंक पोस्टाने येतोच. तो तुम्ही वाचता, त्यातील चित्र रंगवता, तुम्हीही काही चित्र काढता, तुम्ही लिहिलेले लेख, गोष्टी आम्हाला पाठवता. ते छान असतील तर आपण अंकातही छापतो आणि मुख्य म्हणजे तुमच्या छानशा चित्रांना, लेखांना, कथा कवितांना बक्षीसही देतो.

तुमच्या आई-बाबा, काका-काकू, आजी आजोबांसाठी वि.ल.शिंत्रे कथा स्पर्धाही दरवर्षी घेतो. त्यामुळे तुमच्यासारखाच लेखनाचा आनंद त्यांनाही घेता येतो.

आत्ताच मी म्हटलं तसं दर महिन्याला काही जुन्या तर काही नव्याने प्रकाशित होणाऱ्या अंकातील कथा तुम्हाला आता ऐकायला मिळणार आहेत. कशी वाटतीये कल्पना ? तर मग आता वेळ घालवू नका आणि हो यू ट्यूब चॅनेल सबस्क्राईब करा म्हणजे या पुढे येणाऱ्या छान-छान गोष्टी तुम्हाला ऐकायला मिळतील.

(https://www.youtube.com/channel/UCldN5TyiTl2gbe_fxqMID6A)

दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी या कथा तुम्हाला मिळतील, म्हणजे सुटीच्या दिवशी तुम्ही निवांत ऐकू शकाल.

**चला तर मग, वाट कसली पाहतायं? करा चॅनल सबस्क्राईब. आम्ही तुम्हाला छानशी गोष्ट ऐकवायला आतुर आहोत, तुम्हीही सज्ज व्हा.**

तुम्ही जर निर्मळ रानवाराचे वर्गणीदार नसाल, अंकाबद्दल अधिक माहिती हवी असेल तर वंचित विकासच्या ०२०-२४४५४६५८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधा आणि आजच अंकाचे वर्गणीदार व्हा. मुलांसह मोठ्यांनाही वाचायला आवडेल अशा मजकुराने नटलेल्या या अंकाची वार्षिक वर्गणी आहे फक्त दोनशे रुपये. रु.२००/-

वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्याबरोबर सामाजिक उपक्रमामध्ये सहभागी होण्याची अनोखी संधी तुमचे दार ठोठावतीये, त्यामुळे चांगल्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी वेळ कशाला घालवायचा, हो ना !

**रेषा माझ्या रंग तुमचे**

* ५ मे जागतिक व्यंगचित्रकार दिनानिमित्त दि.६ आणि ७ मे २०२२ रोजी बोलक्या रेषा – व्यंगचित्रकार श्री घनश्याम देशमुख यांनी छोट्यांसाठी व्यंगचित्र प्रदर्शन बालगंधर्व कलादालन,पुणे येथे दु.१२ ते सायं.७ या वेळात आयोजित केले होते.

पुण्यातील ११ अभिरुची वर्गातील तसेच फुलवातील एकूण ११४ मुलामुलींनी प्रदर्शनाला भेट देऊन सहभाग घेतला. मुलांना व्यंगचित्रांचे प्रदर्शन बघायला मिळाले. त्याचबरोबर मुलांना काढलेली चित्र रंगवण्यासाठी/नवीन चित्र काढण्यासाठी साहित्य देण्यात आले. काही मुलांनी खूपच सुंदर चित्र रंगवली तर काही मुलांनी चित्र काढली. एक दोन मुलींनी घनश्याम यांनी काढलेली चित्र बघून तशी काढण्याचा प्रयत्न केला.

घनश्याम देशमुख यांनी सर्व मुलांना चित्र कशी काढायची याचे मार्गदर्शन करणारे प्रात्यक्षिक दाखविले. चित्र रंगविलेल्या आणि चित्र काढलेल्या अशा सर्व मुला-मुलींना प्रशस्तिपत्रक ही मिळाले.

याच प्रदर्शनात वंचित विकास संचलित निर्मळ रानवारा मासिकाचाही स्टॉल लावला होता. अभिरुची वर्गातील मुलं आणि प्रदर्शन बघायला आलेल्या लोकांनी स्टॉलला भेट दिली. १२ वर्गणीदार झाले. काहींनी रानवाराचे वेगवेगळे अंकही विकत घेतले.

विश्वकर्मा,दांडेकर पूल,पुणे या अभिरुची वर्गाला येणारी कु.सबा अन्सारी हिने काढलेले चित्र रानवाराच्या मे २०२२ च्या अंकाच्या मुखपृष्ठावर छापले होते. तीही या प्रदर्शनाला उपस्थित होती. तिला मे २२ चा अंक देऊन तिचे कौतुक केले. तिला खूप आनंद झाला.

प्रदर्शन पहायला, चित्र काढायला तसेच त्यासाठी प्रशस्तिपत्रक मिळाल्यामुळे यामुळे मुलं खूष झाली.

प्रदर्शन पाहून झाल्यावर ताया मुलांना संभाजी बागेत घेऊन गेल्या. मुलं बागेत भरपूर खेळली. काही मुलांनी तिथे असलेल्या मेट्रोचा डबा बघितला. अशी निखळ आनंद देणारी मुलांची एक छोटी सहलच झाली.

**मॉर्निंग वॉक**

* दि.११ मे २०२२ रोजी विश्वकर्मा,दांडेकर पूल,पुणे या अभिरुची वर्गातील ६मुलींना घेऊन संगीताताई सारसबागेत सकाळी ७वा.गेली. सकाळच्या वेळेत बागेत चालण्याचा आनंद मुलींनी घेतला. बागेतील तळ्यातले मासे, कासवं बघायला मिळाली. गणपती मंदिरात दर्शन घेतले. प्रसन्न, ताज्या हवेचा अनुभव मुलांना मिळाला.

**राजीव गांधी प्राणी संग्रहालयाला भेट**

* दि.२८ मे २०२२ रोजी अप्पर येथील स्वामी समर्थनगर,बिबवेवाडी,पुणे या अभिरुची वर्गातील ९ मुलांना मनीषाताई आणि अजय दादा 'राजीव गांधी प्राणी संग्रहालय' बघण्यासाठी घेऊन गेले.

विविध जातीचे साप, मगरी, कासव, अजगर, माकडं, नीलगाय, वाघ, सिंह, हत्ती, सरडा, सांबर, लांडगा, काळवीट असे प्राणी तर मोर, घार यासारखे पक्षी मुलांना बघायला मिळाले. प्राण्यांची माहितीही मुलांना मिळाली.

संग्रहालय खूप मोठे आहे. परंतु प्राणी बघण्याच्या उत्सुकतेमुळे सर्व मुलं न कंटाळा करता चालली.

जंगलातले, सहज बघायला न मिळणारे प्राणी प्रत्यक्षात बघायला मिळाले. त्यामुळे मुलं खूपच आनंदून गेली. मजा आली. वेगळा अनुभव त्यांना मिळाला.

संग्रहालयातून बाहेर आल्यावर मुलांनी थंडगार फ्रुटीचा आस्वाद घेतला.

**आमची डब्बा पार्टी**

* दि.६मे २०२२ रोजी जुनी देसाई वीटभट्टी,दांडेकर पूल,पुणे या अभिरुची वर्गातील ४ मुलं आणि ९ मुली यांना स्नेहलताई आणि अजयदादाने स.६वाजता पर्वतीला नेले. कित्येक मुलांनी पर्वतीच्याजवळ राहूनही पर्वती कधी बघितली नव्हती. मुलांनी व्यायाम, सूर्य नमस्कार घातले. खूप मजा केली. पर्वतीवरील मंदिर, ऐतिहासिक गोष्टी पाहिल्या.

याच महिन्यात परत २८ तारखेला मुलं डबा पार्टी करण्यासाठी पर्वतीला गेली. खूप मजा केली. वस्तीतील पालकांना वेळ मिळत नसल्याने अभिरुची वर्गामुळे मुलांना फिरायला मिळते, यामुळे पालक खूष आहेत.

**आम्ही बाग पाहिली**

* २३ मे २०२२ रोजी जुनी देसाई वीटभट्टी, दांडेकर पूल, पुणे वर्गातील १० मुली आणि ३ मुलं एकूण १३ मुलांना स्नेहलताई आणि अजयदादा सारसबागेत घेऊन गेले. बाग, तळं, गणपती मंदिर असे सर्व बघून बरोबर आणलेले डबे खाऊन मुलांनी डबा पार्टी केली.

* दि.३० मे २०२२ रोजी दांडेकर पूल,पुणे येथील अभिरुची वर्गातील ६मुलं, १४ मुली अशा एकूण २० मुला-मुलींना रेखाताई तिथे जवळच असलेल्या मदर तेरेसा बाग,दत्तवाडी,पुणे येथे घेऊन गेली. बागेतील झोके, घसरगुंडी, सी-सॉ असे खेळ मुलांनी खेळले. मुलांनी खूप मजा केली. भेळ खाल्ली.

**अभ्यास सहल**

वंचित विकास संचलित चंडिकादेवी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र पाटणबोरी अंतर्गत नर्सिंग प्रशिक्षण कोर्स बॅच क्रमांक ४ प्रशिक्षणार्थींनींची दि.९,१० मे २०२२ या दोन दिवसांची अभ्यास सहल किनवट,जि.नांदेड येथील साने गुरुजी हॉस्पिटलला भेट देण्यासाठी आयोजित करण्यात आली होती.

या सहलीत मुली, शिक्षिका व कार्यकर्ते अशा एकूण १७ जणांनी सहभाग घेतला होता. ह्या अभ्यास सहलीत हॉस्पिटलची बाह्य आणि अंतर्गत रचना, रुग्णांची केस हिस्ट्री आणि तपासणी, विविध प्रकारच्या चाचण्या, तपासणी लॅब, ऑपरेशन थिएटरची पाहणी, संबंधित इन्स्ट्रूमेंट इ. माहिती घेतली. डॉ.अशोक बेलखुडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्व माहिती देवून मार्गदर्शन वर्ग, प्रश्नोत्तरे, चर्चा इ.माध्यमातून सखोल माहिती दिली.

## चित्रपट - 'निल बट्टे सन्नाटा'

* दि.३० मे २०२२ रोजी विश्वकर्मा, आणि जुनी देसाई विटभट्टी, दांडेकर पूल,पुणे वर्गातील मुलांना अजयदादाने त्याच्या लॅपटॉपवर 'निल बट्टे सन्नाटा' हा चित्रपट दाखवला. एकूण ३३ मुलांनी चित्रपट पाहिला.

एका मध्यम वर्गीय कुटुंबातील आई आणि मुलगी यांच्या जीवनातील संघर्षाशी संबंधित असा चित्रपट आहे. मोलमजुरी, घरकाम करुन एक आई आपल्या मुलीच्या शिक्षणासाठी कशा प्रकारे कष्ट करीत असते हे यातून दाखवण्यात आले. तसेच लहान वयात मुलांचे हट्ट, खोडकर स्वभाव यामुळे अभ्यासाकडे होत असलेले दुर्लक्ष व त्यामुळे मुलांना अपयश मिळाल्यावर येणारा ताण हा कसा असतो हे यातून दाखवले आहे.

## आरोग्य तपासणी शिबिर

### नेत्र तपासणी

* रविवार दि.२२मे २०२२ रोजी गुरुवर्य चाफेकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर भिवाडे बुद्रुक (विरणकाचे), ता. जुन्नर, जि. पुणे येथे सकाळी ११ ते १ यावेळात घेण्यात आले. ८१रुग्णांची मोफत नेत्र तपासणी झाली. १५रुग्ण मोतीबिंदू झालेले आढळले. ७ रुग्ण मोहन ठुसे मोबाईल आय क्लिनिक,नारायणगाव येथे शस्त्रक्रिया करण्यासाठी नेले. शेंबडी, तुकसाई,दुधाणेवाडी, नाणोसे, परळी, पडघवली, ढोकशेत, कोलात्रा, दहिगाव, जांभूळपाडा, उध्दर,ता.सुधागड (बल्लाळेश्वर पाली) जि.रायगड येथे प्रत्यक्ष जाऊन माहिती दिली

### हिमोग्लोबीन तपासणी

* लोहियानगर वसाहतीमध्ये रविवार दि.२२ मे २०२२ रोजी दुपारी ४ ते ६ या वेळात वस्तीतील लोकांसाठी हिमोग्लोबीन तपासणी शिबिर आयोजित केले होते. याचा लाभ ५१ व्यक्तींनी घेतला. यासाठी डॉ.योगेश गायधने, डॉ.रुपाली गायधने व संस्थेचे स्नेही व देणगीदार श्री नितीन करंदीकर यांनी सहकार्य केले.

हिमोग्लोबीन तपासणीसाठी आलेल्या रुग्णांची रक्तदाब व इतर तपासणीही केली. गरजेनुसार त्यांना मोफत औषधेही दिली.

## प्ले विथ गुगल अर्थ ॲप प्रशिक्षण

* दि.३०एप्रिल २०२२ रोजी डॉ. श्रीकांत गबाले यांनी कार्यकर्त्यांचे प्ले विथ गुगल अर्थ या ॲपची माहिती देणारे प्रशिक्षण त्यांच्या ऑफिसमध्ये (प्रभात रोड, पुणे) येथे घेतले. श्रीमती स्नेहल मसालिया, अजय निकुंभ आणि अभिरुची वर्गातील ताई सुलोचना शिवशरण, शैलाताई मालुसरे, तृप्ती फाटक, सुप्रिया धोंगडे यांनी प्रशिक्षणात सहभाग घेतला.

ह्या प्रशिक्षणाचा हेतू वस्तीपातळीवरील मुलांना गुगल अर्थ ॲपची माहिती व्हावी, त्यांना ॲप वापरता यावे असा असल्याने हे प्रशिक्षण घेतल्यानंतर अजयने बहुतेक सर्व अभिरुची वर्गात प्ले विथ गुगल अर्थ ह्या ॲपविषयी लॅपटॉप/मोबाईलच्या माध्यमातून माहिती दिली.

यात गुगल अर्थ मधून आपण सूर्यग्रहण, चंद्रग्रहण, फोटो माहिती घेऊ शकतो हे सांगितले. या ॲपमुळे कोणतेही देश, राज्य, संकेत स्थळ बघू शकतो. थ्रीडी स्वरुपातही बघू शकतो.

गुगल अर्थचा वापर करुन रस्ते, जंगल, वाळवंट, नदी, धरण, बिल्डिंग पाहू शकतो. एखाद्या ठिकाणचे क्षेत्रफळ, रुंदी, उंची, खोली, उतार हे जाणून घेऊ शकतो आणि आधी कसे दिसत होते हेही पाहता येते.

मुलांना नवीन ॲप, उपयोगी माहिती कळली. मुलांनी अजय दादालाही प्रश्न विचारले. मुलांचा उत्साह वाढला होता. चर्चा झाली. खूप आवडले.

## सायबर गुन्हे या विषयावरील बैठक

* दि.२२एप्रिल २०२२ रोजी ज्ञानदेवी चाईल्ड लाईन,पुणे च्या वतीने सायबर गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड यांच्या सहकार्याने एक मिटींग आयोजित करण्यात आली होती. 'वाढते सायबर गुन्हे' हा विषय होता. पिंपरी चिंचवडचे ए सी पी सायबर क्राईम यांनी मार्गदर्शन, शंकानिरसन केले. त्यांचे सत्र खूप माहितीपुर्ण होते. मुलांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, स्वयंसेवक, बालसेना सदस्य यावेळी उपस्थित होते. वंचित विकासच्या वतीने श्रीमती शैला मालुसरे, श्रीमती तृप्ती फाटक, श्री अजय निकुंभ हे कार्यकर्ते उपस्थित राहिले.

## उद्योजकता प्रशिक्षण शिबिर

* दि.२४ मे ते दि.२७ मे २०२२ या कालावधीत दुपारी ३ ते ५.३० या वेळात ढोले मळा, डायसप्लॉट,पुणे येथे उद्योजकता प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते. या प्रशिक्षण शिबिरामध्ये ५० महिला सहभागी झाल्या होत्या. यासाठी लर्निंग लिंक फाऊंडेशनचे प्रशिक्षक श्री अविनाश टिकार यांचे सहकार्य मिळाले.

## महाराष्ट्र दिनानिमित्त झेंडा वंदन

* कासारगाव ता.जि.लातूर येथे महाराष्ट्र दिनानिमित्त झेंडा वंदन करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या मुख्याध्यापक, शिक्षक, अंगणवाडी कार्यकर्ते, तसेच इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

## आदरणीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्यासमवेत ऑनलाईन संवाद

* दि.३१ मे २०२२ रोजी पीएम स्वनिधीच्या लाभार्थीशी देशाचे पंतप्रधान आदरणीय श्री नरेंद्रजी मोदी यांनी संवाद साधला. सदर संवाद कार्यक्रम मा.जिल्हाधिकारी,पुणे यांनी आयोजित केला होता. श्वेता ओतारी, गजानन पवार, विनायक दहिभाते या कार्यकर्त्यांनी यासाठी परिश्रम घेतले.

यावेळी मा.पंतप्रधान यांनी देशातील गरीबी दूर करण्यासंदर्भात तसेच पदपथावरील विक्रेत्यांचा व्यवसाय सन्मानपूर्वक होण्यासाठी मार्गदर्शन केले.

* पुणे शहरातील हातगाडी फेरी पथारी स्टॉलधारक यांच्या विविध प्रकारच्या अनेक कारवाई करण्यात आल्या. पथविक्रेता अधिनियमानुसार कामकाज होत नाही, पीएम स्वनिधी कर्ज उपलब्ध करुन दिले जात नाही. यास इतर समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला. त्या संदर्भात मा.किरण कुलकर्णी आयुक्त तथा संचालक नगरपरिषद संचालनालय व मा.रोहिदास दोरकुळकर उपायुक्त एन यु एल एम,महाराष्ट्र शासन यांच्याकडे समस्यांवर चर्चा केली आहे. त्याचबरोबर सन ९ जानेवारी २०१७ पासून पथविक्रेता उपजिविका संरक्षण व रक्षण योजना लागू होत नसल्याने जाणीवने स्वतंत्र प्रारुप पथविक्रेता उपजिविका संरक्षण व रक्षण योजना सन २०२२-२०२३ तयार करुन दि.२० मे २०२२ रोजी प्रत्यक्षात

नगरपरिषद संचालनालय चेंबूर येथील कार्यालयात सादर केली आहे.

* दि.२६ मे २०२२ रोजी राष्ट्रीय हॉकर्स दिनानिमित्त मा.आयुक्त तथा प्रशासक पुणे महानगरपालिका यांना निवेदन व शासनाकडे सादर केलेल्या प्रारुप योजना व सारसबाग, तुळशीबाग येथील बंद व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रयत्न केल्यामुळे व्यवसाय सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. शुल्क थकबाकी भरण्यासाठी तीन हप्त्यांत विभागून देण्यात येऊन चेकने शुल्क आकारणी करण्याची मागणीही मान्य केली आहे. पीएम स्वनिधी कर्ज योजना उपलब्ध करुन देणे व पीएम स्वनिधी से समृध्दी योजनेनुसार पथविक्रेता सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण सुरु करणे या विषयावर मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी मा.श्री विलास कानडे अतिरिक्त आयुक्त विशेष, मा.श्री माधव जगताप उपआयुक्त अतिक्रमण निर्मूलन विभाग, मा.श्रीमती रंजना गगे उपआयुक्त समाज विकास विभाग यांनी जाणीव सोबत तातडीने बैठक घेऊन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. त्यानुसार त्याच दिवशी बैठक झाली त्यात सर्व प्रकारच्या विषयावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले आहेत व त्यांची अंमलबजावणी सुरु झाली आहे.
यासाठी पूर्ण महिना कैलास बोरगे, गजानन पवार, विनायक दहिभाते, श्वेता ओतारी, यांनी परिश्रम घेतले.

**देणाऱ्याने देत जावे ....**

*** खूप लोकांना सामाजिक बांधिलकीची जाणीव असते त्यांना त्यांच्या सोयीने वेळ द्यायला आवडतो. त्यांची कोणतेही काम करायची तयारी असते. विनाअपेक्षा, विनामोबदला ते काम करतात. पण या सर्वात महत्त्वाचे असते ते सातत्य. सातत्याने काम करणारी माणसे मोजकीच असतात.**

**आपल्या संस्थेमध्ये सातत्याने विनाअपेक्षा, विनामोबदला येऊन स्वयंसेवी वृत्तीने काम करणाऱ्या सुचित्राताई कर्वे व श्रीकांताताई बिहाणी या दोघी आहेत. या दोघींप्रती संस्था कृतज्ञ आहे. आम्हाला त्यांचे कौतुक वाटते आणि त्यांच्याबद्दल आदर व अभिमान वाटतो.**

**श्रध्दांजली**

संस्थेच्या हितचिंतक,देणगीदार व स्नेही, ज्येष्ठ संस्कृत तज्ज्ञ प्रा. लीला अर्जूनवाडकर यांचे दि.५एप्रिल २०२२ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले.
बातमी अनपेक्षित नव्हती तरीही मनाला चटका लावून गेली.
अत्यंत प्रज्ञावान प्राध्यापक म्हणून त्या प्रसिध्द होत्या. विविध प्रकारच्या सामाजिक कार्याशी त्या जोडलेल्या होत्या.
आजच्या काळात बृध्दिमान, करारी, तत्वनिष्ठ, अभ्यासू, व्यासंगी व्यक्तीमत्व अशा जीवनाचा आदर्श बाईंच्या रुपाने साकारला होता.
बाईंच्या स्मृतीस वंदन !

मुस्लिम महिलांचे शोषण करणारा तिहेरी तलाक रद्द करण्यासाठी आयुष्य वेचणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सय्यदभाई यांचे दि.८ एप्रिल २०२२ रोजी दुःखद निधन झाले.
दगडावरची पेरणी या पुस्तकाचे ते लेखक होते. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे ते माजी अध्यक्ष होते. त्यांच्या कार्याचा केंद्र सरकारने पद्मश्री किताब देऊन सन्मान केला होता.
ते संस्थेचे हितचिंतक व मित्र होते. त्यांच्या निधनाने मुस्लिम प्रबोधनाचे क्रांतीकारक पर्व सपले.
अत्यंत बहुअंगी, बहुगुणी असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.
सय्यदभाईंच्या स्मृतीस सादर प्रणाम !

* संस्थेचे कार्यकर्ते श्री मच्छिंद्रनाथ म्हेत्रे यांचे वडील शंकर तुकाराम म्हेत्रे यांचे दि.१७ मे २०२२ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.
जाणीव संघटना व वंचित विकासचे सर्व कार्यकारिणी सदस्य व कार्यकर्ते म्हेत्रे कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहेत.
कै.बाबांच्या स्मृतीस सादर प्रणाम !

**एप्रिल २०२२ मधील आर्थिक स्वरुपात देणगी देणारे देणगीदार**

१. Aimtech Systems,Pune २.श्रीमती सुहासिनी बिवलकर,पुणे ३.श्री मच्छिंद्रनाथ म्हेत्रे,नारायणगाव ४.श्री विनायक लगड,पुणे ५.श्री अनिल कुंभार, पुणे ६.श्री चैतन्य मोहरीर,पुणे ७.श्री अरविंद धारवाडकर,पुणे ८.श्री अरविंद बापट,पुणे ९.श्री मीननाथ अंबिके,पुणे १०.श्रीमती मुग्धा कटके,पुणे ११.श्रीमती अपर्णा गजेंद्रगडकर,पुणे १२.श्री संग्राम जाधव,पुणे १३.डॉ.नीलम ताटके,पुणे १४.श्री के.पी.सप्रे,पुणे १५.श्रीमती स्मिता कुर्तकोटी,पुणे १६.श्रीमती शालिनी भागवत,मुंबई १८.श्री दिपक खेडेकर,मुंबई १९.श्रीमती हेमलता भिडे,मुंबई २०.श्रीमती उषा शिंपी,मुंबई २१.श्रीमती अर्चना महाले,मुंबई २२.श्रीमती मंदाकिनी खांडेकर,पुणे २३.श्री विजय श्रोत्रीय,पुणे २४.एन जी भोसले चॅरिटेबल अँड रिलिजस ट्रस्ट,पुणे २५.श्री संजय कुडी,पुणे २६.श्रीमती विश्रांती नाईक २७.श्री भूषण पंडीत २८.श्रीमती अंजली गाडगीळ,मुंबई २९.श्रीमती शुभांगी हेंद्रे,पुणे ३०.श्रीमती प्रचिती एडगावकर,पुणे ३१.श्रीमती मंगल बक्षी,पुणे

**मे २०२२ मधील आर्थिक स्वरुपात देणगी देणारे देणगीदार**

१.श्री अरविंद धारवाडकर,पुणे १.श्री मयुरेश जोशी,ठाणे ३.श्रीमती श्रध्दा चासकर,नेरळ ४.श्रीमती प्रचिती चासकर,नेरळ ५.श्रीमती प्रतिभा शिंदे,पुणे ६.श्री शरदचंद्र कुलकर्णी,पुणे ७.श्रीमती सुजाता गजेंद्रगडकर,पुणे ८.श्रीमती शशीकला भिडे,ठाणे ९.श्रीमती अनुराधा काळे,ठाणे १०.श्री संजय साबणे ११.डॉ.संध्या रिसबूड,पुणे१२.श्री प्रभाकर भिकुले,पुणे १३.श्रीमती अरुणा काळे,पुणे १४.श्री सुरेंद्र नावडे,पुणे १५.श्री रिदकिरण मुंदडा,पुणे १६.श्रीमती विद्या घोलप,पुणे १७.श्री अमित जोशी,पुणे १८.श्री सदाशिव पंडीत,पुणे१९.श्री मुकुंद अत्रे,पुणे २०.श्री

गणेश बापये,पुणे २१.श्री अरविंद बापट,पुणे २२.श्री रोहित गोगटे,मुंबई २३.श्री हेमचंद्र भुर्के,मुंबई २४.श्री दिपक निरगुडे,पुणे २५.श्रीमती श्यामला गनबोटे,पुणे २६.श्री आशुतोष पटवर्धन,पुणे २७. Equanamity Advisory Services Pvt.Ltd.Mumbai २८.पौर्णिमा शेरेकर,पुणे ३९.श्री नितीन करंदीकर,पुणे ३०.श्री सतीश ब्रम्हे,पुणे ३१.श्रीमती विनया लेले,पुणे ३२.श्रीमती रंजिता आरेकर,पुणे ३३.श्री योगेश यादव,पुणे ३४.श्रीमती स्मिता पांडे,पुणे ३५.श्रीमती मुक्ती संन्याल, दिल्ली ३६. श्रीमती प्रचिती एडगावकर,पुणे

**एप्रिल २०२२ मधील वस्तुरुपाने देणगी देणारे देणगीदार**

१.श्रीमती हेमलता पाठक,पुणे २.श्री रांजणेकर,,पुणे ३.श्री पवन गायकवाड,पुणे ४.श्री रितेश जैन,पुणे ५.श्री अमोल काळे,पुणे ६.श्रीमती पल्लवी शेवाळे,पुणे ७.श्रीमती सुप्रिया कुलकर्णी,पुणे ८.श्री विरेंद्र गनबोटे,पुणे ९.श्री प्रसाद भालेराव,पुणे १०.श्रीमती भाग्यश्री आगाशे,पुणे ११.श्रीमती रेवती पूरकर,पुणे १२.श्रीमती साक्षी कापसे,पुणे १३.श्री मेहेंदळे,पुणे १४.डॉ. हेमंत आपटे,पुणे १५.श्री विलास राजवाडे,पुणे १६.श्री गिरीष भागेवाडी,पुणे १७.श्रीमती शांता जोशी,पुणे १८.श्रीमती शुभदा कुलकर्णी,पुणे १९.श्रीमती पद्मजा क्षीरसागर,पुणे २०.श्रीमती पूजा दुर्गे,पुणे २१.श्रीमती शुभांगी दामले,पुणे २२.श्रीमती प्रज्ञा थत्ते,पुणे २३.श्री निखिल परचुरे,पुणे २४.जितो-वर्धमान सांस्कृतिक भवन,पुणे २५.श्रीमती रजनी शिवदे,पुणे २६.श्रीमती ज्योती जोशी,पुणे

**मे २०२२ मधील वस्तुरुपाने देणगी देणारे देणगीदार**

१.श्रीमती देवयानी गोंगले,पुणे २.श्री शरद कुलकर्णी,पुणे ३.श्री अनिश पिंपळखुटे,पुणे ४.ॲड.तानाजी गायकवाड,पुणे ५.श्रीमती मानसी दीक्षित,पुणे ६.श्रीमती गीतांजली मोरे,पुणे ७. श्री संजय शहा,पुणे ८.श्री सतीश मेहता,पुणे ९.श्रीमती कल्पना कुलकर्णी,पुणे १०.श्रीमती संगीता वासुळकर,पुणे ११.श्रीमती निलिमा वळसंगकर,पुणे १२.श्री अमेय वर्तक,पुणे १३.श्रीमती विनया लाटकर,पुणे १४.श्री पंढरीनाथ हगवणे,पुणे १५.श्री बाळासाहेब झेंडे,पुणे १६.श्रीमती स्मिता राजे,पुणे १७.श्रीमती अरुणा कारले,पुणे१८.श्रीमती प्रांजली रानडे,पुणे १९.श्रीमती संध्या हुलकोपकर,पुणे २०.श्रीमती छाया पाटणे,पुणे २१.श्रीमती भाग्यश्री चौथाई,पुणे २२.श्रीमती श्रीकांता बिहाणी,पुणे २३.श्रीमती सुचरिता मराठे,पुणे २४.श्रीमती विनिता मंगळवेढेकर,पुणे २५.श्री महेश चितळे,पुणे २६.श्री दत्ता नेटके,पुणे २७.श्री अशोक गावडे,पुणे २८.श्रीमती जयश्री गोडबोले,पुणे २९.श्री गजानन जोशी,पुणे ३०.श्रीमती निरुपमा दिवेकर,पुणे ३१.श्री निखिल परचुरे,पुणे

**देगणीदारांसाठी नम्र विनंती**

* प्राप्तीकर खात्याच्या सुचनेनुसार प्रत्येक देणगीदाराकडून पॅनकार्ड नंबर किंवा आधारकार्ड नंबर घेऊन तो देणगीच्या पावतीवर टाकणे संस्थेला बंधनकारक आहे. तरी कृपया आम्हाला पॅनकार्ड नंबर किंवा आधारकार्ड नंबर देऊन सहकार्य करावे ही विनंती.

* काही देणगीदार देणगीची रक्कम संस्थेच्या बँकेच्या खात्यात जमा करतात. आम्हाला बँकेकडून देणगीदाराचे नाव समजू शकत नाही. सर्व देणगीदारांना नम्र विनंती आहे की, संस्थेच्या खात्यात देणगीची रक्कम जमा केल्यास प्रत्यक्ष, फोनवर किंवा इ मेलव्दारे संस्थेच्या प्रशासनाला कळवावे म्हणजे पावती करणे, आपला पॅनकार्ड नंबर किंवा आधारकार्ड नंबर घेणे सोयीचे होईल.

आपण सर्वजण देणगी देऊन संस्थेचे काम पुढे नेण्यास मोलाचा हातभार लावता याची आम्हाला कृतज्ञतापूर्वक जाणीव आहे.

*** कोरोना १९ मुळे स्थगिती देण्यात आलेली वस्तुरुप देणगी स्वीकारण्यास आता सुरुवात केली आहे. कपडे देताना स्वच्छ असावेत, फाटके, खराब झालेले कपडे तसेच आतले कपडे स्वीकारण्यात येणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. वस्तुरुपाने देणगी, नारायण पेठेतील केंद्र कार्यालयात स्वीकारली जाईल.**


# वंचित विकास

**केंद्र कार्यालय :४०५/९, नारायण पेठ, मोदी गणपती मागे,**

**पुणे ४११०३०**

**फोन नं. : (०२०) २४४८३०५०/२४४५४६५८**

**मोबाईल नं. : ७९७२०८६७३०**

**ई मेल : vanchitvikas85@gmail.com**

**वेबसाईट : http://vanchitvikas.org**

**संस्था नोंदणी : महा/२५५३/८६(पुणे)**

**न्यास नोंदणी : एफ ३१२१ (पुणे)**



# संवादिनी

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**

**वंचित विकास**

**४०५/९, नारायण पेठ, मोदी गणपतीच्या मागे, पुणे ४११०३०**

**केवळ खाजगी वितरणासाठी (विनामूल्य)**

**बुक-पोस्ट**


श्री/श्रीमती : ______________________

______________________

______________________

______________________

______________________